Exh. 1/C

# मा.जिल्हा व सत्र न्यायालय,केज यांचे न्यायालयात.

कि.फौ.अ.(जामीन)क्र. 101 /2026

**अर्जदार :-** **किरण साधु सुर्यवंशी**

**वय**-45 वर्षे, धंदा- शेती,

रा. सोनी जवळा, ता.केज, जि.बीड

**विरुध्द**

**गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन (पोलीस स्टेशन युसूफवडगाव)**

**(A) प्रकरणाचा तपशील**

गुन्हा क्रमांक : 68/2026

पोलीस स्टेशन : **यूसूफवडगाव, ता.केज, जि.बीड**

लागू कलमे : कलम 64(**2**)F, 351(2)

कमाल शिक्षा : कायद्यानुसार

**(B) कोठडी व प्रक्रिया**

अर्जदारास अद्याप अटक झालेली नाही.

अर्जदारास अटकेची वाजवी भीती आहे.

**(C) खटल्याची स्थिती**

तपास प्रक्रिया सुरू आहे / पूर्ण आहे.

**(D) गुन्हेगारी पूर्वइतिहास**

गु.र.क्र. : नाही

पोलीस स्टेशन : निरंक

लागु कलमे:- निरंक

**(E) पूर्वीचे जामीन अर्ज**

निरंक

**(F) सक्तीची प्रक्रिया**

अजामीनपात्र वॉरंट – नाही

मा.न्यायालयाने घोषीत केलेला आरोप – नाही

**प्रकरण** :- 482 **बी.एन.एस.एस.**

**अर्जदार आपला अटकपुर्व जामीनचा अर्ज सेवेत सादर करत आहे.**

1) **हे की,** प्रकरणातील फिर्यादी हिने दिनांक 21/03/2026 रोजी पोलिस स्टेशन युसूफवडगाव, ता.केज, जि.बीड येथे येवुन अर्जदाराचे विरोधात फिर्याद दिल्यावरून **गु.रं.नं.**68/2026 **कलम** 64(2 )f, 351 (2) **बी.एन.एस.**2023 प्रमाणे खोटा गुन्हा नोंद केला आहे. त्यामुळे अर्जदारास पोलीस अटक करतील याची भिती असल्याने तो खालील मुद्दयांवर त्याचा अटक पुर्व जामीनचा अर्ज दाखल करीत आहे.

1) **हे की,** प्रकरणातील अर्जदार/आरोपी याने कसल्याही प्रकारचा गुन्हा केलेला नाही तो निर्दोष आहे.

2) **हे की,** सदरची फिर्याद ही चुक, खोटी व बनावट स्वरुपाची दाखल केलेली आहे. फिर्यादीत सांगितल्याप्रमाणे वास्तवात अशी कुठलीच घटना घडलेली नाही. प्रकरणातील अर्जदार हा निर्दोष असून त्याने कसल्याही प्रकारचा गुन्हा केलेला नाही.

3) **हे की,** फिर्यादीने सदरची फिर्याद ही विचार विनीमय करून चुक, खोटी व बनावट स्वरुपाची व वैयक्तीक द्वेषापोटी दिलेली आहे.

4) **हे की,** फिर्यादीचे बारकाईने अवलोकन केले असता, फिर्यादीमध्ये लावलेले गुन्हा कलम हे अर्जदारास लागु होत नाहीत.

5) **हे की,** अर्जदार हा त्याचे कुटूंबाचा कर्ता पुरूष असून अर्जदारास अटक झाली तर त्याचे कुटूंबीयांवर उपासमारीची वेळ येवू शकते. तसेच अर्जदार/ आरोपीची सोनीजवळा, ता.केज, जि.बीड येथे स्थावर व जंगम मालमत्ता असल्यामुळे अर्जदार फरार होणार नाही किंवा कुठल्याही प्रकारचा साक्षपुरावा फोडणार नाही.

6) **हे की,** प्रकरणात तपास पुर्ण झालेला असून फक्त दोषारोपत्र दाखल होणे बाकी आहे.

7) **हे की,** प्रकरणातील अर्जदार हा प्रतिष्ठीत नागरीक असून कायद्याचे तंतोतंत पालन करणारा आहे.

8) **हे की,** फिर्यादीचे बारकाईने अवलोकन केले असता, प्रथमदर्शी सदरची घटना खोटी असल्याचे दिसुन येते. केवळ सुड बुध्दीने अर्जदारास खोट्या गुन्ह्यात गोवले आहे.

9) **हे की,** फिर्यादीचे बारकाईने अवलोकन केले असता, प्रकरणातील अर्जदार यास पोलिस कोठडीची आवश्यकता दिसुन येत नाही, कारण अर्जदाराकडून कुठलीही गोष्ट/वस्तु जप्त करणे नाही. त्यामुळे अर्जदारास पोलीस कोठडीची अजिबात अवश्यकता नाही म्हणून आरोपीस अटकपुर्व जामिन देणे न्यायाचे आहे.

10) **हे की,** प्रकरणातील अर्जदार हा समाजातील प्रतिष्ठीत व्यक्ती असुन त्याचे गावामध्ये व आसपासच्या गावामध्ये चांगली प्रतिष्ठा व स्वच्छ प्रतिमा आहे.

केवळ ती प्रतिष्ठा व स्वच्छ असलेली प्रतिमा मलीन व्हावी म्हणून सदरची चुक खोटी व बनावट फिर्याद फिर्यादीने दाखल केलेली आहे. हे स्पष्ट दिसून येते.

11) **हे की,** प्रकरणातील अर्जदार हा मा.न्यायालयाच्या प्रत्येक अटी व शर्तीचे पालन करण्यास तयार आहे.

12) **हे की,** प्रकरणातील अर्जदार / आरोपी हा प्रत्येक तारखेला न्यायालयात हजर राहण्यास तयार आहे.

13) **हे की,** प्रकरणातील अर्जदार हा मा.न्यायालयाच्या अटी व शर्तीचे पालन करुन मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जामीन देण्यास तयार आहे.

14) **हे की,** या मा. न्यायालया व्यतिरीक्त अर्जदाराने भारतातील कुठल्याही न्यायालयात जामीन अर्ज दाखल केलेला नाही अथवा प्रलंबित नाही.

करीता अर्जदार यास गु.र.क्र. 68/2026 पोलीस स्टेशन युसूफवडगाव, ता.केज, जि.बीड मधुन अटकपुर्व जामीनीवर मुक्त करणे न्याय व आवश्यक आहे.

**तरी विनंती की,**

अर्ज मान्य करण्यात येवून अर्जदार यास गु.र.क्र. 68/2026 पोलीस स्टेशन युसूफवडगाव, ता.केज,जि.बीड मधुन अटकपुर्व जामीनीवर मुक्त करण्यात यावे.

**दिनांक :-15/04/2026**

**अर्जदार**

Kiran

**किरण साधु सुर्यवंशी**

रा. सोनी जवळा, ता.केज, जि.बीड

**अर्जदाराचे विधीज्ञ**

RM Dhaygude

**ॲड.आर.एम.धायगुडे,**

**अंबाजोगाई.**

Order
Issue Notice to State, Complainant/ Informant.

sd/-
I/c. A.S.J.
Kaij.